

# मेट्रो-३ मार्ग, कोस्टल रोड बांधकामाच्या चित्तथरारक दृश्यांचा प्रदर्शनातून उलगडा

**मुंबई** : मुंबई मेट्रो मार्ग-३च्या १५ दिवसांच्या छायाचित्र प्रदर्शनासह नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्सने (एनसीपीए) नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाच्या बांधकामादरम्यानची चित्तथरारक दृश्य छायाचित्राच्या माध्यमातून उलगडा झाला आहे. विशेष म्हणजे अभियांत्रिकी अविष्कार व प्रकल्पाची जटिलता समजून घेण्याची ही एक सुवर्ण संधी उपलब्ध झाली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले, तर यावेळी एनसीपीएचे चेअरमन के. एन. संतुक आदी उपस्थित होते.

एनसीपीएच्या नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीत मुंबई मेट्रो मार्ग-३, मुंबई सागरी मार्ग आणि मुंबई पार बंदर प्रकल्पासारख्या शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या निर्मितीची अनुभूती या छायाचित्र प्रदर्शनातून अनुभवता येणार आहे. यासाठी छायाचित्र प्रदर्शनाच्या ३ भागांची मालिका आयोजित करण्यात आली असून, मेट्रो मार्ग-३ च्या छायाचित्र प्रदर्शनापासून या उपक्रमाला सुरुवात होत आहे. मेट्रो-३ वरील हे प्रदर्शन मुंबईकरांना ३ ते १६ मार्च दरम्यान दुपारी १२ ते ८ या वेळेत पाहता येणार आहे.

## प्रकल्पाचे एकूण ७९.८ टक्के काम पूर्ण

**मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाचे एकूण ७९.८ टक्के बांधकाम पूर्ण झाले असून, यातील पहिला टप्पा आरे ते बीकेसीचे ८५.२ टक्के तर दुसरा टप्पा बीकेसी ते कफ परेडचे ७६ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.**